नियमित दिवाणी दावा क्र. ८४/२०१८
सुजाता वि. हरि
CNR No. MHRG090006522018

**निशाणी क्र. २७ खालील आदेश**

**(दिनांक १३.१२.२०२३)**

१] प्रस्तुतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रीया संहितेच्या आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यात दुरुस्तीसाठी दिला आहे. सदरील अर्जाद्वारे वादी प्रस्तूत न्यायालयाचे आदेशान्वये न्यायालयीन आयुक्तांनी वाद मिळकतीची मोजणी केली असता प्रतिवादी याने वाद मिळकतीमध्ये घराचे ७.०० x ७.०० मी. लांबी रुंदीचे एकूण ४९.०० चौ.मी. व घराला लागून टाकीचे २.५० x १.७० मी. लांबी रुंदीचे एकूण ४.२५ चौ.मी. अतिक्रमण केल्याचे त्यांना आढळले व सदर अतिक्रमीत जागेचा खुला व निर्विवाद ताबा वादींना मिळावा, अशा स्वरूपाची दुरूस्ती करण्याची परवानगी मिळण्याची त्यांनी मागणी केली.

२] प्रस्तुतचे अर्जास प्रतिवादीने त्याचे म्हणणे सादर करून हरकत घेतली. त्याचे कथनाप्रमाणे न्यायालयीन आयुक्त यांनी दिलेला अहवाल मोघम असून त्या आधारे कथनामध्ये दुरूस्तीचे अनुशंगाने दिलेला प्रस्तुतचा अर्ज कायदेशिर नाही. सबब त्याने तो फेटाळण्याची विनंती केली आहे.

३] उभय पक्षांच्या वि. विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादींनी प्रस्तुतचा दावा अतिक्रमण दूर करून मिळणेकरीता व निरंतर मनाई हूकूमाकरीता दाखल केल्याचे दिसून येते. महत्वाची बाब म्हणजे न्यायालयाचे आदेशान्वये न्यायालयीन आयुक्त यांनी केलेल्या वाद मिळकतीच्या मोजणी अंती त्यांना प्रतिवादीने वाद मिळकतीमध्ये घराचे ७.०० x ७.०० मी. लांबी रुंदीचे एकूण ४९.००

चौ.मी. व घराला लागून टाकीचे २.५० x १.७० मी. लांबी रुंदीचे एकूण ४.२५ चौ.मी.अतिक्रमण केल्याचे आढळल्याबाबत नकाशासह अहवाल अभिलेखावर दाखल केला.

४] उल्लेखनीय म्हणजे दावा दुरूस्तीचा अर्ज विचारात घेतेवेळी त्यातील कथन हे सत्य आहे किंवा कसे? हे न्यायालयाला पडताळता येत नाही. प्रस्तूत दाव्याची संपरिक्षा अजुन सुरू झालेली नाही. त्याचप्रमाणे प्रस्तावित दुरूस्तीने दाव्याचे मुळ स्वरूप बदलत नाही. याउलट ती वादाचे संपूर्ण व कायमस्वरूपी निराकरण करण्यासाठी आवश्यक असल्याचे दिसून येते. पुढे प्रस्तावित दुरूस्तीने प्रतिवादींच्या हक्कांना कूठलीही बाधा पोहोचत नाही. परिणामी, दाव्याचे स्वरूप विचारात घेता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत ठरेल. या कारणास्तव मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज (नि. क्र. २७) मंजूर करण्यात येतो.

२. वादींना या अर्जाच्या अनुषंगाने दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते.

३. वादींनी आजपासुन १४ दिवसांच्या आत दाव्यात दुरुस्ती करावी, दूरूस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी आणि त्याची प्रत प्रतिवादीला द्यावी.

स्वाक्षरी/–
(एस.एस.महाले)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
रोहा, जि. रायगड-अलिबाग.

स्थळ : रोहा.
दिनांक : १३/१२/२०२३.

(टिप – डिजीटल स्वाक्षरीची मुदत संपल्यामुळे प्रस्तूतचा दस्त डिजीटल स्वाक्षरीने सही केलेला नाही.)